# देवाचे लोक शरीराप्रमाणे एकत्रित काम करतात

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, मुलांनी एकमेकांना शक्य ती सर्व मदत करावी, एखादया व्यक्तीच्या विविध अवयवां प्रमाणे त्यांनी एकजूटीने कार्य करावे याकरीता ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे.''

मुलांचा वयोगट आणि उपलब्ध वेळ यानुसार कार्यक्रम निवडा.

**चित्र कोडे जुळवा.**



- एका मोठया कागदावर एका मुलाची आकृती काढून ती मुलांना दाखवा. कागद जितका मोठा तेवढा चांगला.
- ह्या चित्राचे तुकडे करुन प्रत्येक मुलाला किमान एक तुकडा द्या. मुलांना त्यांच्याकडील तुकडयांनी चित्र जुळवण्यास सांगा. मोठया मुलांनी लहानांना मदत करावी.
- गटामध्ये जास्त मुले असतील तर अनेक चित्रे काढून त्यांचे तुकडे करा आणि ते तुकडे वेगवेगळे ठेवा. मुलांना गट तयार करायला सांगा आणि प्रत्येक गटाला एकेक चित्र द्या.
- गट लहान असेल तर चित्राचे तुकडे तुम्हांला खोलीत लपवून ठेवता येतील. मग मुलांना ते शोधून काढून चित्र जुळवण्यास सांगा.
- मुले त्यांच्याकडील चित्राचा तुकडा जुळवतील तेव्हा त्यांनी काय करावे अशी देवाची इच्छा आहे याबद्दल सांगावे. उदाहरणे सांगा : आईवडीलांची आज्ञापाळा, देवावर भरंवसा ठेवा, देवावर प्रेमकरा, लोकांवर प्रेम करा, शत्रूंना क्षमा करा, एकमेकांची सेवा करा. दान द्या. लोकांना येशू विषयी सांगा, उपासना करा, प्रार्थना करा, पवित्र शास्त्राचा अभ्यास करा इत्यादी.
- देवाची इच्छा काय आहे हे जाणून घेण्यास मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

**मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी :** 1 करिंथ 12:4-26 मधील शरीराचे उदाहरण स्पष्ट करुन सांगावे.

- आपण आपल्या मंडळीला 'शरीर' असे म्हणतो, कारण आपण सर्वजण आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचे आहोत. तो आमचे मस्तक आणि आम्ही त्याचे शरीर आहोत.
- देव लोकांना त्याच्या मंडळीत एकमेकांची सेवा करण्यासाठी विशेष काम नेमून देतो.
- असे विशेष काम नेमून दिलेले लोक एकत्रित काम करणाया आमच्या शरीरातील अवयवांसारखे असतात.

एक शरीर म्हणून आपण कसे काय करतो याविषयी **प्रश्न विचारा** *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे)*

- मंडळीमध्ये लोकांना कोणकोणती कामे करता येतात? *(पाहा वचने 8-10)*
- प्रत्येकाला त्यांचे त्यांचे आध्यात्मिक कृपादान कोण देते? *(वचन 11)*
- पवित्र आत्मा ख्रिस्तातील विश्वासणायांचा कशाने बाप्तिस्मा करतो? *(वचने 12-14).*
- समजा, संबंध शरीरच डोळा असते तर काय झाले असते *(वचन 17)*
- शरीरातील एखाद्या व्यक्तीला दु:ख होते किंवा मान सन्मान मिळतो तेव्हा आपण काय करतो? *(वचन 26)*

लोक एकमेकांबरोबर काम करीत नाहीत तेव्हा शरीराचे कार्य कसे चालते ते मुलांनी दाखवावे.

- पाय म्हणजे देवाची सुवार्ता इतर ठिकाणी नेणारे लोक हे स्पष्ट करा. मग म्हणा, ''समजा दोन पैकी एक पायाने आपले काम केले नाही तर शरीर कसे चालेल ते आम्हांला दाखवा.'' (मुलांनी उडया माराव्यात).
- डोळयांसाठी असेच करा *(आम्ही काय करावे अशी देवाची इच्छा आहे हे पाहणारे लोक).*

1 करिंथ 12 मधील भागांचे नाट्यीकरण करा.

- मुलांना ही छोटीशी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढ्यायांशी बोलून व्यवस्था करा. तुम्ही सर्व भागांचे नाट्यीकरण केलेच पाहिजे असे नाही. मोठया मुलांनी तयारीसाठी मदत करावी.

  मोठया मुलाने **देवाची वाणी** म्हणून बोलावे.

  चांगले शिकवता येणाया **मोठया मुलाने** किंवा **शिक्षकाने शिक्षकाची** भूमिका करावी.

  **इतर मुलांनी पाय, हात, डोळे व कान** ह्या भूमिका कराव्यात.

**शिक्षक :** 4-13 ह्या वचनांचे स्पष्टीकरण करुन म्हणा, ''देवाचा आत्मा काय म्हणतो ते ऐका.''

**देवाची वाणी :** ''या, शरीराचा एक भाग व्हा. मी तुमचा बाप्तिस्मा करतो तेव्हा मी तुम्हांला ख्रिस्तरूप शरीरामध्ये आणतो आणि मी तुम्हांला निरनिराळी कामे वाटून देतो. ही कामे करण्यासाठी लागणारी शक्ती-सामर्थ्य मीच तुम्हांला देतो. एकमेकांची सेवा करण्यासाठी ह्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करा.

**पाय, हात, डोळे व कान :** हात धरुन गोलाकार उभे राहा. एका वेळी पूर्ण गोलात फिरा, गट मोठा असेल तर मोठया वर्तुळात लहान वर्तुळ तयार करा.

**शिक्षक :** 14-21 ही वचने स्पष्ट करुन म्हणा, ''दोन आळशी पायांचे म्हणणे ऐकून घ्या.''

**पाय :** वर्तुळ सोडून बाहेर या. मोठयाने म्हणा, ''ह्या पायांची कोणाला काहीच काळजी नाही. आम्ही आपले गट सोडून जातो!'' ''मी हात नाही म्हणून मी सेवा करणार नाही! मला हात व्हायचे आहे!'' (वर्तुळात असणायांनी खाली पडावे).

**कान :** (रागाने) ''मी तर काय एक कान आहे!''

''मी डोळा असतो तर बरे झाले असते!'' (वर्तुळ सोडा)

**हात :** ''मी हात आहे, सर्वात अधिक महत्वाचा आहे!''

''मला अन्य कोणाची गरज नाही!'' (वर्तुळ सोडा)

**डोळे :** ''मी डोळा आहे! ए, नाका मला तुझी काही गरज नाही!''

''तुझ्याशिवायही मला चांगले दिसते.'' (वर्तुळ सोडा)

**शिक्षक :** 22-26 ही वचने स्पष्ट करुन म्हणा, ''पवित्र आत्मा काय म्हणतो ते ऐका!''

**देवाची वाणी :** ''तुम्ही सर्वजण असे वर्तुळात या. देव तुम्हा प्रत्येकाचा उपयोग करतो!''

**पाय, हात, डोळे व कान :** पुन्हा वर्तुळात या आणि परत एकदा गोल वर्तुळात फिरा.

**शिक्षक वा मोठे मूल :** नाटिकेसाठी मदत करणाया प्रत्येकाचे आभार माना. मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न मुलांनी त्यांना विचारावेत.

**चर्चा.** निरनिराळया आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करुन एकमेकांची सेवा आपल्याला कशी करता येईल याविषयी मुलांना आणि प्रौढांना विचारा.

हाताच्या पंजाचे साधे चित्र काढून मुलांना तसे काढायला सांगा. त्यांनी हे चित्र पुढील उपासना सभेच्यावेळी मोठया माणसांना दाखववावेआम्हा सर्वांना एकमेकांची सेवा करता यावी यासाठी देव आम्हांला निरनिराळी कृपादाने देऊन सामर्थ्य कसे देतो. यामुळे शरीराच्या विविध अवयवांसारखे आम्हांला काम करता येते. हे या चित्रावरून स्पष्ट होते असे मुलांनी समजावून सांगावे.



**पाठ करा.** मोठया मुलांनी इफिस. 4:15-16 तर लहानांनी गलती 5:13 पाठ करावे.

**कविता.** पाच मुलांनी स्त्रोत 100 मधील प्रत्येकी एक वचन म्हणावे.

एक शरीर म्हणून आपण एकत्रितपणे कसे काम करतो याविषयी मोठया मुलांनी कविता किंवा गाणी लिहावीत. आठवडयात हे काम त्यांनी करावे.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू आम्हा प्रत्येकाला गटात काम दिल्याबद्दल धन्यवाद. एकमेकांची सेवा करण्यास आमचे साहाय्य कर. आम्ही इतर लोकांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहोत असे विचार आमच्या मनातून काढून टाक, प्रत्येक विश्वासणारा तुझ्या दृष्टीने महत्त्वाचा आहे लक्षात ठेवण्यास आम्हांला मदत कर.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net